**नि. फौ. ख. क्र. १/२०१८**
**शासन वि. मंगेश शिंदे वगैरे.**
नि.क्र.

**रोहा येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, रोहा जिल्हा रायगड**
**यांच्या न्यायालयात**
**दोषारोप**

मी स. दि. कमलाकर, प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, रोहा जिल्हा रायगड तुमच्यावर

१. मंगेश महादेव शिंदे.
वय ४१ वर्षे, व्यवसाय – शेती,

२. तुकाराम महादेव शिंदे.
वय ५९ वर्षे, व्यवसाय – शेती,

दोन्ही रा. तांबडी खुर्द,
ता. रोहा, जिल्हा रायगड.

खालीलप्रमाणे दोषारोप ठेवतो –

दि.२९.११.२०१७ रोजी २०–३० वा.च्या सुमारास या न्यायालयाच्या स्थळसिमेत, पोलीस ठाणे रोहाच्या कार्यक्षेत्रात मौजे तांबडी खुर्द गावाच्या हद्दीत, मारुती मंदिराचे समोर, सार्वजनीक रस्त्यावर, तुम्ही तुमच्या समान उद्देशाने, मृत्यू होण्याचा संभव आहे असे साधन म्हणजेच लाकडी दांडका फिर्यादीच्या डाव्या कानावर व दगडाने डोक्यात मारून इच्छापुर्वक दुखापत पोहचविली व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **३२४** सह कलम **३४** अन्वये गुन्हा केला आहे.

याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या समान उद्देशाने फिर्यादीस शिवीगाळ करुन अपमानीत केले व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम

**५०४** सह कलम **३४** अन्वये  गुन्हा केला आहे.

याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या समान उद्देशाने फिर्यादीस जीवे मारण्याच्या धमक्या देवून धाकट पटशा केला व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **५०६** सह **३४** अन्वये  गुन्हा केला आहे.

आणि मी याद्वारे तुमच्याविरुध्द वरील गुन्हयाकरीता खटला चालवण्याचे निर्देश देतो.

---स्वाक्षरी---
(स. दि. कमलाकर)
दिनांक २३–१०–२०१९ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, रोहा.

<u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, आरोपींना उपरोक्त दोषारोप मराठी भाषेत वाचून व समजावून सांगीतला.

मोहोर

---स्वाक्षरी---
(स. दि. कमलाकर)
दिनांक २३–१०–२०१९ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, रोहा.